# शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे

**१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ पुणे-१**

दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२२२१७ फॅक्स क- ०२०- २६१२२२१७

ई-मेल आयडी- dydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune.com


(1)

दिनांक :-१५/०६/२०१७

## पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालय इ. ११वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१७-१८

## प्रसिध्दी निवेदन

पुणे व पिंपरी चिंचवड, नाशिक, मुंबई, औरंगाबाद, अमरावती, नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील माध्यमिक शाळांमधील इ. ११ वी चे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने करणेबाबत कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे. सदर प्रवेश प्रक्रिये अंतर्गत होणा-या कोटा प्रवेश व केंद्रीय प्रवेशाबाबत प्रसिध्दी निवेदन पुढील प्रमाणे.

**कोटा प्रवेशः-**

इनहाऊस/अल्पसंख्याक/व्यवस्थापन/तांत्रिक या कोटयातील प्रवेश कनिष्ठ महाविदयालय स्तरावर होतील संबंधित कनिष्ठ महाविदयालयाच्या शाखा व माध्यमनिहाय एकूण प्रवेश क्षमतेच्या इनहाऊस २०% अल्पसंख्याक ५० % व्यवस्थापन ५ % कोटा असेल. तसेच इ. १० वी परीक्षा V1/V2/V3 किंवा NSQF चे विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक कोटा २५ टक्के असेल. उपरोक्त कोटया अंतर्गत पात्र असणा-या व प्रवेश घेवू इच्छिणा-या विदयार्थ्यांनी खालील कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

**कोटया अंतर्गत प्रवेशासाठी पात्रतेचे निकष :-**

१. **इनहाऊस कोटा** - एकाच संस्थेच्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थी त्या संस्थेच्या उच्च माध्यमिक विदयालय/कनिष्ठ महाविदयालयाच्या इनहाऊस कोटयात प्रवेशासाठी पात्र राहील. सदर २०% इनहाऊस कोटयातील प्रवेश हे प्रचलित नियमानुसार होतील.

२. **अल्पसंख्याक कोटा-** अल्पसंख्यांक कोटा हा धार्मिक तसेच भाषिक अल्पसंख्याकांसाठी ५० % जागा आरक्षित आहे. कनिष्ठ महाविदयालयाला ज्या प्रकारच्या अल्पसंख्याक दर्जाचे प्रमाणपत्र प्राप्त असेल त्या प्रमाणपत्रातील नोंदीनुसार संबंधित विदयार्थी त्या कोटयातील प्रवेशासाठी पात्र असतील.त्यासाठी विदयार्थ्याच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक बाबतच्या नोंदी असणे आवश्यक आहे. अल्पसंख्याक कोटयातील प्रवेश हे गुणवत्तेनुसार होतील.

३. **व्यवस्थापन कोटा** - सदर कोटा सर्व कनिष्ठ महाविदयालयासाठी (५%) असेल, या कोटया अंतर्गत प्रवेशासाठी कोणताही विदयार्थी पात्र असेल व्यवस्थापन कोटयातील प्रवेश कनिष्ठ महाविदयालय व्यवस्थापन स्तरावर होतील.

४. **तांत्रिक कोटा -** सदर कोटा इ. १० वी परीक्षा V1/V2/V3 किंवा NSQF चे व्यवसाय शिक्षण विषय घेऊन उत्तीर्ण झालेले विद्यार्थी बायफोकल किंवा एचएसव्हीसी (एमसीव्हीसी) प्रवेशासाठी २५ टक्के असेल.

उपरोक्त ४ प्रकारच्या कोटया अंतर्गत प्रवेश घेण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यपदधत्ती निश्चित करण्यात आली आहे.

**अ) कोटयांतर्गत प्रवेश घेणा-या विदयार्थ्यासाठी कार्यपध्दती –**

१. **http://pune.11thadmission.net** या वेबसाईटच्या होमपेजवर नमुना प्रवेश अर्ज उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर अर्ज विद्यार्थ्याने डाऊनलोड करुन त्याची प्रिंट घ्यावी. तसेच सदर अर्जाची प्रत संबधित कनिष्ठ महाविद्यालयातुन विद्यार्थ्यांसाठी मोफत उपलब्ध करुन देण्यात येईल.

२. सदर अर्जातील तपशीलाप्रमाणे संपूर्ण माहिती भरावी.

३. सदर कोटयातील प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी ऑनलाईन केंद्रीय प्रवेश अर्जाचा भाग १ व भाग २ भरुन सबमिट करुन त्याची प्रिंट घेणे बंधनकारक आहे.

४. कोटया अंतर्गत प्रवेशाच्या अर्जासोबत ऑनलाईन केंद्रीय प्रवेश अर्ज भाग १ व भाग २ ची प्रिंट जोडणे आवश्यक आहे. तसेच अर्जात नमूद केल्याप्रमाणे इतर कागदपत्रे ही सोबत जोडावीत.

५. विद्यार्थ्यानी कोटया अंतर्गत प्रवेशाच्या वेळापत्रकाची नोंद घ्यावी व दिलेल्या मुदतीत प्रवेश घ्यावा अन्यथा त्याचा प्रवेशावर हक्क राहणार नाही.

६. **विद्यार्थ्यांने कोणत्याही कोटयातून पूर्ण शुल्क भरून प्रवेश घेतल्यास केंद्रीय प्रवेशासाठी त्याचे नांव प्रतिबंधित करण्यात येईल.**

७. हे सर्व प्रवेश महाविद्यालयास्तरावरुन ऑनलाईन पध्दतीने अपडेट केले जाणार आहेत.

**ब ) कनिष्ठ महाविदयालयांसाठी कार्यपध्दती**

१. कनिष्ठ महाविदयालयांनी उपरोक्त कोटयातील प्रवेशासाठी कोणत्याही प्रकारचा स्वतंत्र प्रवेश अर्ज विकसित अथवा विक्री करु नये.

२. सदर प्रवेश प्रक्रिया अर्ज व प्रक्रिया राबविण्यासाठी कोणतेही शुल्क घेवू नये.

३. विदयार्थी, कोटयातील प्रवेशासाठी अर्ज वेबसाईटवरुन डाऊनलोड करुन भरुन देईल अथवा कनिष्ठ महाविदयालयाने त्या अर्जाच्या प्रती मोफत उपलब्ध करुन द्याव्यात.

४. कनिष्ठ महाविदयालयाने शाखा ,माध्यम व कॉलेज कोडनिहाय कोटयातील प्रवेशाचे अर्ज स्विकारावेत. अर्ज स्विकारल्यावर विदयार्थ्यास पोहोच द्यावी व रजिस्टरमध्ये कॉलेज कोडनिहाय नोंद ठेवून अर्ज देणा-याची स्वाक्षरी घ्यावी.

५. सर्व प्राप्त अर्जांची कोटानिहाय व कॉलेज कोडनिहाय सर्वसाधारण गुणवत्ता यादी तयार करावी. सदर यादी सूचनाफलक व कनिष्ठ महाविदयालयाच्या वेबसाईटवर दिलेल्या वेळापत्रकानुसार प्रसिध्द करावी.

६. पहिली गुणवत्ता यादी दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे संबंधित कोटयाच्या क्षमतेइतकी प्रसिध्द करावी.

७. वेळापत्रकाप्रमाणे http://pune.11thadmission.net या वेबसाईटवर कॉलेज log-in मध्ये संबंधित कोटयामध्ये त्यांचा application number टाकून ॲडमिट करावेत विद्यार्थ्याचे पूर्ण शुल्क घेवुन प्रवेश निश्चित करावा. **विद्यार्थ्याने कोटयातील प्रवेश निश्चित केल्यानंतर केंद्रीय प्रवेशासाठी त्याचे नांव प्रतिबंधीत करण्यात येईल.**

८. कोटयाअंतर्गत प्रवेशाची दुसरी गुणवत्ता यादी वेळापत्रका प्रमाणे जाहीर करताना रिक्त जागा लक्षात घेऊन उर्वरीत कोटयाअंतर्गत प्रवेशाच्या प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना गुणवत्ता क्रमाने प्रवेश द्यावेत.

९. कोटा प्रवेशाच्या रिक्त जागा वेळापत्रकानुसार केंद्रीय प्रवेश समितीस ऑनलाईन प्रत्यार्पित करुन द्याव्यात. कोटा प्रवेशाच्या शिल्लक जागांपैकी आवश्यकेतनुसार कनिष्ठ महाविद्यालयांनी ठेवून घेतलेल्या जागा संबधित कोटयास पात्र विद्यार्थ्यांमधून अंतिम फेरीपर्यंत भरण्याची मुभा राहील. तथापि, महाविद्यालयांनी ठेवून घेतलेल्या जागा नियमित फे-या सुरु झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत प्रत्यार्पित करता येणार नाहीत.

**महत्वाची सूचना :-**

१) कोटयांतर्गत केलेले प्रवेश **http://pune.11thadmission.net** या वेबसाईटवर कनिष्ठ महाविदयालयाच्या log-in मध्ये नियोजित वेळापत्रकाप्रमाणे ॲडमिट करणे तसेच विद्यार्थ्यांनी रदद केलेले प्रवेश सदर वेबसाईटवरच cancel करणे सर्व महाविदयालयांना बंधनकारक आहे. सदर वेबसाईटवर अपडेट झालेले प्रवेशच ग्राहय धरण्यात येतील याची संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाने नोंद घ्यावी.

२. कोटयांतर्गत प्रवेश इ.११ वी चे प्रवेश प्रक्रियेत कनिष्ठ महाविदयालयांना दिलेल्या संकेतांकानुसार (college code no)अपडेट करावेत.

4

# पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालय इ.११वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१७-१८ चे वेळापत्रक

| अ.क्र. | दिनांक | वेळ | तपशील |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | १६ जून २०१७ ते २७ जून २०१७ | शेवटच्या दिवशी सायं. ४.०० वाजेपर्यंत | **http://pune.11thadmission.net** या संकेतस्थळावर प्रवेश अर्जाचा भाग-१ व भाग- २ भरणे व सबमिट करणे |
| २ | १७ जून २०१७ ते २७ जून २०१७ **(२६ जून २०१७ ईद सुट्टी वगळून)** | शेवटच्या दिवशी सायं- ४.०० वाजेपर्यंत | कोटा प्रवेशाचे अर्ज (इनहाऊस/अल्पसंख्यांक/ व्यवस्थापन/तांत्रिक कोटयासाठी) कनिष्ठ महाविद्यालये स्विकारतील, सदर अर्जाचा नमुना **http://pune.11thadmission.net** या संकेतस्थळाच्या होमपेजवर उपलब्ध आहे. |
| ३ | २८ जून २०१७ | सकाळी ११.०० वाजता | कनिष्ठ महाविद्यालये कोटा प्रवेशासाठी आलेल्या सर्व पात्र अर्जांची कोटानिहाय व कॉलेज कोडनिहाय गुणवत्ता यादया (कोटा प्रवेश पहिली गुणवत्ता यादी) प्रसिध्द करतील. |
| ४ | २८ जून २०१७ व २९ जून २०१७ | सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत | कनिष्ठ महाविद्यालये वर नमुद (कोटयातील प्रवेश) यादयांमधील विद्यार्थ्यांचे कॉलेज कोडनिहाय पुर्ण शुल्क घेवून प्रवेश करतील, सदर प्रत्येक प्रवेश कॉलेज लॉग-इन मध्ये ऑनलाईन अपडेट करुनच करावा. |
| ५ | २९ जून २०१७ | सायं. ६.०० वाजता | कोटा प्रवेशाच्या रिक्त जागा कॉलेज लॉग-इन मधून ऑनलाईन प्रत्यार्पित (Surrender) करता येतील. |
| ६ | २९ जून २०१७ | सायं. ७.०० वाजता | केंद्रीय प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची वैयक्तिक माहिती तपासणीसाठी ऑनलाईन प्रसिध्द् करणे. |
| ७ | ३० जून २०१७ | सकाळी ११ ते ४.०० वाजेपर्यंत | विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन प्रवेश अर्जातील वैयक्तिक माहितीबाबत हरकती/त्रुटी असल्यास मार्गदर्शन केंद्रावर लेखी स्वरुपात स्वीकारल्या जातील, हरकतीच्या अर्जाचा नमुना http://pune.11thadmission.net या संकेतस्थळाच्या होमपेज वर उपलब्ध आहे. |
| ८ | ३० जून २०१७ | | लेखी अर्जाप्रमाणे हरकतींची दुरुस्ती |
| ९ | ३० जून २०१७ | सकाळी ११.०० वाजता | कनिष्ठ महाविद्यालये रिक्त जागांनुसार कोटयातील प्रवेश (इनहाऊस/अल्पसंख्यांक /व्यवस्थापन/ तांत्रिक) दुसरी गुणवत्ता यादी प्रसिध्द करतील. |
| १० | ३० जून २०१७ व १ जुलै २०१७ | सकाळी ११.०० ते सायं. ४.०० वाजेपर्यंत | कनिष्ठ महाविद्यालये वर नमुद कोटयातील प्रवेश पुर्ण शुल्क घेवून करतील, सदर प्रत्येक प्रवेश कॉलेज लॉग-इन मध्ये ऑनलाईन अपडेट करुनच करावा. |

5

| अ.क्र. | दिनांक | वेळ | तपशील |
|---|---|---|---|
| ११ | १ जूलै २०१७ | सायं. ६.०० वाजता | कोटा प्रवेशाच्या रिक्त जागा कॉलेज लॉग-इन मधून ऑनलाईन प्रत्यार्पित (Surrender) करता येतील. कनिष्ठ महाविद्यालयांनी कोटा प्रवेशाच्या ठेवून घेतलेल्या जागा नियमित फे-या सुरु झाल्यानंतर प्रत्यार्पित (Surrender) करता येणार नाहीत. |
| १२ | ५ जूलै २०१७ | सकाळी ९.०० | केंद्रीय प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादी प्रसिध्द |
| १३ | ५,६,७ जूलै २०१७ | सकाळी ११.०० ते सायं ४.०० वाजेपर्यंत | केंद्रीय प्रवेशाच्या पहिल्या गुणवत्ता यादीतील प्रवेश |
| १४ | ८ जूलै २०१७ | सायंकाळी ४.०० वाजता | रिक्त जागांचा तपशिल व पहिल्या फेरीचे कट ऑफ http://pune.11thadmission.net या संकेतस्थळावर प्रसिध्द |
| १५ | ९ जूलै २०१७ व १० जूलै २०१७ | सकाळी ९.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत | विद्यार्थ्यांनी पसंतीक्रम बदल (प्रवेश अर्ज भाग-१) भरावयाचा असल्यास भरणे |
| १६ | १३ जूलै २०१७ | सकाळी १०.०० वाजता | केंद्रीय प्रवेशाच्या दुस-या गुणवत्ता यादी प्रसिध्द |
| १७ | १३ जूलै २०१७ ते १४ जूलै २०१७ | सकाळी ११.०० ते सायं. ४.०० वाजेपर्यंत | केंद्रीय प्रवेशाच्या दुस-या गुणवत्ता यादीतील प्रवेश |
| १८ | १५ जूलै २०१७ | सायंकाळी ४.०० वा. | रिक्त जागांचा तपशिल व दुस-या फेरीचे कट ऑफ वेबसाईटवर प्रसिध्द् |
| १९ | १६, १७ जूलै २०१७ | सकाळी ९.०० ते सायं. ५ वाजेपर्यंत | विद्यार्थ्यांनी पसंतीक्रम बदल (प्रवेश अर्ज भाग-२) करावयाच्या असल्यास करणे |
| २० | १९ जूलै २०१७ | सकाळी १०.०० वाजता | केंद्रीय प्रवेशाची तिसरी गुणवत्ता यादी प्रसिध्द् |
| २१ | १९ व २० जूलै २०१७ | सकाळी ११.०० ते सायं. ४.०० वाजेपर्यंत | केंद्रीय प्रवेशाची तिसरी गुणवत्ता यादीतील प्रवेश |
| २२ | २१ जूलै २०१७ | सकाळी ११.०० वाजता | रिक्त जागांचा तपशिल तपशिल व तिस-या फेरीचे कट ऑफ http://pune.11thadmission.net या संकेतस्थळवर प्रसिध्द् |
| २३ | २१ व २२ जूलै २०१७ | सकाळी ११.०० पासून सायं- ५.०० वाजेपर्यंत | विद्यार्थ्यांनी पसंतीक्रम भरुण (प्रवेश अर्ज भाग-२) भरावयाचा असल्यास भरणे . |
| २४ | २४ जूलै २०१७ | सकाळी ११.०० वाजता | केंद्रीय प्रवेशाची चौथी गुणवत्ता यादी प्रसिध्द् |
| २५ | २४ व २५ जुलै २०१७ | सकाळी ११.०० ते सायं ४.०० वाजेपर्यंत | केंद्रीय प्रवेशाच्या चौथ्या गुणवत्ता यादीतील प्रवेश |
| २६ | २६ जुलै २०१७ | | इ. ११ वी चे नियमित वर्ग सुरु होतील. |

(दिनकर टेमकर)
अध्यक्ष
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

5 JUN 2017